ePaper

# सरकारमध्ये आत्मविश्वास व निर्णयक्षमतेचा अभाव: अजित पवार

वर्ष - 7 ।अंक -61 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- मार्गिकांचे काम रेल्वेला?
- सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी महापालिका प्रशासनाचा ‘मास्टर प्लॅन’!

www.mahaenews.com

।शुक्रवार, दिनांक 30 जून 2023

महाईन्यूज ई-पेपर | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



# दुमदुमली पंढरी!

## चंद्रभागेला भक्तीचा महापूर, भाविकांची मांदियाळी

**।पंढरपूर। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**कमालीचा भक्तिभाव मनी बाळगून शेकडो किलोमीटरची पायी आलेल्या आणि वाहनांमधून एकादशीसाठी आलेल्या सुमारे दहा लाख वारकऱ्यांनी आपली वारी विठुरायाच्या चरणी रुजू केली. चंद्रभागा स्नान, नामदेव पायरीचे दर्शन,मंदिर प्रदक्षिणा आणि कळस दर्शन हा नित्यनेम वारकऱ्यांनी केला. टाळ-मृदंगाचा गजर आणि हरिनामाच्या जयघोषाने पंढरीनगरी दुमदुमून गेली होती. त्यामुळे पंढरीत अवघे गर्जे पंढरपूर, चालला नामाचा गजर, या अभंगाची प्रचिती आली.**

आजि सोनियाचा दिनु।
वर्ष अमृताचा धनु ।।
हरि पाहिला रे हरि पाहिला रे।
सबाह्याभ्यंकरी अवघा व्यापक मुरारी।।

पंढरीत मंदिर प्रदक्षिणा करताना कळसाच्या दर्शनाच्या वेळी वारकऱ्यांच्या मनात ही भावना होती. आपली परंपरेची वारी रुजू झाली, याचा मनस्वी आनंद वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.

बुधवारी रात्री उशिरा श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत निवृत्तिनाथ महाराज, संत सोपानदेव महाराज, संत मुक्ताई, संत एकनाथ महाराज, संत निळोबाराय यांच्या पालखी सोहळ्यांसमवेत लाखो वारकरी पायी पंढरीत दाखल झाले.

पहाटे तीनपासूनच चंद्रभागेचा तीर भाविकांच्या गर्दीने भरून गेला होता. चंद्रभागेला पाणी सोडल्यामुळे वारकऱ्यांना सोयीचे झाले. सकाळी आठच्या सुमारास माऊलींची पादुका मालक राजाभाऊ आरफळकर यांनी चंद्रभागा स्नानासाठी नेल्या.

त्या साडेअकराच्या सुमारास पुन्हा नाथ चौकातील मंदिरात आल्या. पादुका दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. संत तुकाराम महाराजांच्या पादुकांना सकाळी नऊच्या सुमारास स्नान घालण्यात आले.

यावेळी संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोरे तसेच विद्यमान सोहळाप्रमुख, आजी माजी विश्वस्त, मानकरी उपस्थित होते. सोपानदेव महाराजांच्या पादुका सकाळी सहा वाजता स्नानासाठी निघाल्या. मानकरी केंजळे बंधू यांनी स्नान घातले. त्यावेळी सोहळाप्रमुख त्रिगुण महाराज गोसावी उपस्थित होते. पालखी पुन्हा नऊ वाजता मंदिरात आली. मुक्ताबाई यांच्या पादुका चार वाजता स्नानासाठी निघाल्या. यावेळी रवींद्रभैय्या पाटील, सोहळाप्रमुख रवींद्र महाराज हरणे उपस्थित होते.

या वेळी निवृत्तिनाथ महाराजांच्या पादुकांनाही चंद्रभागेत स्नान घालण्यात आले. पुंडलिक दर्शनाला रांग होती. संत नामदेव महाराजांच्या पादुका दर्शनासही गर्दी होत होती. त्यामुळे भाविकांनी वारकऱ्यांची परंपरेप्रमाणे हे सर्व उपचार पूर्ण करून विठ्ठलाच्या मंदिराला प्रदक्षिणा करून कळसाचे दर्शन घेत होते.

## पेरण्यांमुळे वारकऱ्यांना काळ्या आईची ओढ

गेल्या चार दिवसांपासून राज्याच्या सर्वदूर पाऊस सुरू झाला आहे. यंदा पेरण्या नसल्याने अनेक जण वारीला येऊ शकले नाही. ते थेट एकादशीला दर्शनाला दाखल झाले. मात्र गेल्या दोन दिवसांपासून पावसाला सुरूवात झाली आहे.

त्यामुळे पेरण्या उरकण्यासाठी वारकरी आपली वारी रुजू करून परतताना दिसत आहेत. एक दिवसासाठी आलेले वारकरी आणि वारीत आलेले वारकऱ्याची नित्यनेम करून घरी परतताना दिसत होते. सकाळपासून एसटी स्थानकाकडे वारकऱी जाताना दिसत होते. सतरा-अठरा दिवस पायी वारी करून विठुमाउलीची वारी पूर्ण केल्यानंतर वारकऱ्यांना आता आपल्या काळ्या आईची ओढ लागली आहे.

# मार्गिकांचे काम रेल्वेला?

## » पुणे-लोणावळा दरम्यानच्या विस्तारित मार्गिकांचा अहवाल प्रगतिपथावर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-लोणावळा दरम्यानच्या विस्तारित मार्गिकांचा अहवाल प्रगतिपथावर आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली याबाबत नुकतीच बैठक पार पडली आहे.पुणे-लोणावळा दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) बनविण्याचे काम 'मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन'कडून (एमआरव्हीसी) करण्यात येत आहे. मात्र, हा प्रकल्प कोण पूर्णत्वाला नेईल, याबाबत स्पष्टता नसली तरी मध्य रेल्वेच्या बांधकाम विभागाला अशा कामांचा अनुभव असल्यामुळे त्यांच्याकडून या प्रकल्पाचे काम केले जाण्याची शक्यता आहे.**



गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे-लोणावळा दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेसंदर्भात बैठक झाली. बैठकीत या प्रकल्पाचा ५० टक्के खर्च राज्य सरकार उचलणार आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम 'महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन'कडे (महारेल) देण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवली होती. रेल्वेचे प्रकल्प कोणत्या विभागाला द्यायचे याबाबतचा निर्णय रेल्वे मंत्रालय घेते. 'महारेल'कडे अशा प्रकल्पाचे काम करण्याचा अनुभव नाही. ही कंपनी केवळ नवीन मार्गिका टाकण्याचे काम करते.

पुणे-लोणावळा दरम्यान आताच्या दुहेरी मार्गिकांच्या शेजारी आणखी दोन मार्गिका टाकण्यात येणार आहेत. पुणे ते लोणावळा हे अंतर ६३ किलोमीटर आहे. या दरम्यान एकूण १७ स्थानके आहेत. सध्याच्या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाच्या बाजूलाच दोन नव्या मार्गिका टाकण्यात येणार आहेत. मात्र, मार्गिकांना स्थानकांना जोडण्याचे काम अत्यंत अवघड आहे. या कामांसाठी 'यार्ड रिमॉडलिंग' करावे लागणार आहे.

यात सिग्नलचे खांब बदलावे लागतील; तसेच रुळांचेही काम केले जाणार आहे. त्यामुळे हे काम रेल्वेशिवाय अन्य संस्थांकडे सोपवणे अवघड आहे. ओडिशातील बालासोरच्या रेल्वे अपघातानंतर रेल्वे प्रशासन सिग्नल आणि ब्लॉकच्या बाबतीत खूपच संवेदनशील झाले आहे. या पद्धतीचे काम करण्याचा अनुभव 'महारेल'कडे नाही. 'एमआरव्हीसी'ला या कामांचा अनुभव असला, तरी त्यांचे काम केवळ मुंबईपुरतेच मर्यादित आहे. त्यामुळे पुणे-लोणावळा प्रकल्पाचे काम रेल्वेकडूनच केले जाण्याची शक्यता आहे.

### प्रकल्पाचे महत्त्व काय?

**»पुणे-लोणावळा दरम्यान मार्च १९७८मध्ये लोकल सेवा सुरू झाली. तेव्हापासून या मार्गावर तिसरी मार्गिका टाकण्याची मागणी केली जात आहे. सध्या पुणे-लोणावळा या मार्गावर ४२ लोकल, ८०हून अधिक एक्स्प्रेस आणि सुपरफास्ट एक्स्प्रेस धावतात. या मार्गावर दोनच मार्गिका असल्याने उपनगरीय वाहतुकीवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे या सेवेचा विस्तार करणेही शक्य होत नाही. परिणामी, तिसरी आणि चौथी मार्गिका उपलब्ध झाल्यास लोकल सेवा दर पंधरा मिनिटांनी सुरू करणे शक्य होणार आहे. त्याचा फायदा प्रवाशांना होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प तातडीने पूर्ण करावा, अशी मागणी प्रवासी संघटनांकडून केली जात आहे.**

---

# तरुणीवरील हल्ल्यानंतर आता पुण्यात वाहनांची जबरदस्त तोडफोड!

## » मद्यधुंद तरुणांनी भरदिवसा कोयत्याने फोडल्या गाड्या

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याच्या चांदणी चौकातील वाहतूक ही काही काळासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी पर्यायी सेवा रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.**



मागील काही दिवसांपासून शहरात होणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे पुणे चर्चेत आले आले. पिंपरी चिंचवड येथे दोन जणांनी भरदिवसा हातात कोयते घेत नागरिकांच्या वाहनांची तोडफोड केली आहे. मागील काही दिवसांपासून पुणे शहरातील कायदा सुव्यस्था बिघडल्याचे दिसून येत आहे. दोन दिवसांपूर्वीच सहकारनगर परिसरात गाड्यांची तोडफोड करण्यात आली होती. मात्र आता पुणे शहराबरोबरच पिंपरी चिंचवड शहरात देखील गाड्या फोडीचे सत्र सुरू झाले आहे. पिंपरी चिंचवड शहरातील चिखली घरकुल परिसरात दोन व्यक्तींनी दारूच्या नशेत चारचाकी वाहनांची तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेने चिखली घरकुल परिसरात खळबळ उडाली असून गाड्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, पिंपरी चिंचवड परिसरातील चिखली घरकुल आणि शरद नगर परिसरात बुधवारी दुपारी साडेचारच्या सुमारास दोन व्यक्ती मद्यधुंद अवस्थेत आल्या. त्यांनी हातात कोयते घेऊन येथील चारचाकींसह आठ ते दहा वाहनांची नाहक तोडफोड केली. वाहने फोडल्यानंतर त्यांनी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनेची दखल घेत या दोघांना अटक केली आहे.

भरदिवसा अशा प्रकारची घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. या घटनेत वाहनांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ही सर्व घटना सीसीटिव्ही मध्ये कैद झाली असून आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पुण्याबरोबरच पिंपरी चिंचवड शहरात देखील कोयता गँग सक्रिय झाल्याचे आता पाहायला मिळत आहे. पुणे शहरात सलग दोन ते तीन दिवस वाहने फोडीच्या घटना घडल्या होत्या. त्यामध्ये देखील नागरिकांच्या गाड्यांचे मोठे नुकसान झाले होते. आता पिंपरी चिंचवड शहरात हा प्रकार घडल्याने कोयता गँग आता पुन्हा सक्रिय होते की काय अशी परिस्थिती आता निर्माण होऊ लागली आहे. या घटनेतील आरोपींना शिक्षा व्हावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# कर्ज घेतल्यानंतर बदनामीची भीती घातली, 'लोन ॲप'द्वारे तरुणीची फसवणूक

। पुणे । महाईन्यूज ।



'लोन ॲप'द्वारे तीन हजार रुपयांचे कर्ज घेणे तरुणीला चांगलेच महागात पडले आहे. कर्ज घेतल्यानंतर बदनामीची भीती घालून तरुणीकडून एक लाख ११ हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. 'लोन ॲप'द्वारे तीन हजार रुपयांचे कर्ज घेणे तरुणीला चांगलेच महागात पडले आहे. कर्ज घेतल्यानंतर बदनामीची भीती घालून तरुणीकडून एक लाख ११ हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी लष्कर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरुणीला तातडीने तीन हजार रुपयांची गरज होती. तिने एका 'लोन ॲप'च्या माध्यमातून तीन हजार रुपयांचे कर्ज घेतले. तरुणीच्या खात्यात तीन हजार रुपये जमा करण्यात आले. त्यानंतर एकाने तरुणीच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. त्याने तरुणीला बदनामी करण्याची धमकी दिली. अश्लील संदेश आणि छायाचित्रे प्रसारित करण्याची भीती दाखवून तरुणीकडून वेळोवेळी एक लाख ११ हजार रुपये उकळले. तरुणीने घाबरून पैसे दिले. हा प्रकार थांबत नसल्याने वैतागलेल्या तरुणीने लष्कर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिस निरीक्षक प्रियंका शेळके (गुन्हे) तपास करीत आहेत.

'लोन ॲप'द्वारे कर्ज देण्याच्या बहाण्याने नागरिकांना धमकावून त्यांना गंडा घातल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडल्या आहेत. समाजमाध्यमांत बदनामी झाल्याने दोन तरुणांनी आत्महत्या केल्याचीही घटना घडली होती.

# विचार शून्यता ही मोठी समस्या!

## मंत्री नितीन गडकरी : प्रा. रामकृष्ण मोरे 'परामर्श एका शिल्पकाराचा' पुस्तकाचे प्रकाशन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राजकीय जीवनामध्ये प्रा. रामकृष्ण मोरे यांचे साहित्य, संस्कृती चित्रपट, कला तसेच समाजसेवा याविषयीचे विचार पक्के होते. त्यामुळेच प्रा. मोरे यांनी सर्वच क्षेत्रात लीलया मुशाफिरी केली आणि आपल्या कार्य कर्तृत्वाचा ठसा उमटवला. सध्याच्या राजकीय सामाजिक परिस्थिती पाहता विचार शून्यता ही मोठी समस्या आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.**




प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या जीवनावरील 'परामर्श एका शिल्पकाराचा' ज्येष्ठ पत्रकार विजय जगताप लिखित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आकुर्डी येथे करण्यात आला. यावेळी नितीन गडकरी बोलत होते. प्रकाशन समारंभास काँग्रेसचे नेते दिग्विजय सिंह, ज्येष्ठ नेते उल्हास दादा पवार, पीसीईटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील, आमदार अश्विनीताई जगताप, आमदार उमा खापरे, ज्येष्ठ साहित्यिक आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे गजानन एकबोटे, लेखक विजय जगताप, अंशुल प्रकाशनच्या संचालिका तृप्ती विजय जगताप, राजीव जगताप आदी उपस्थित होते.

यावेळी हर्षवर्धन पाटील, डॉ. सदानंद मोरे यांनी ही मनोगत व्यक्त केले. लेखक विजय जगताप यांनी पुस्तक लिहिण्यामागची भूमिका विशद केली. स्वागत उल्हासदादा पवार यांनी केले. सूत्रसंचालन सुधीर गाडगीळ यांनी तर आभार मंदार चिकणे यांनी केले.

### टोलचे पैसे बँक खात्यातून कापणार...

वर्षाच्या अखेरीस देशभरात 26 ग्रीन एक्स्प्रेस वे बांधले जातील आणि नवीन टोल नियमही जारी केले जाणार असल्याची माहिती नितीन गडकरी यांनी दिली. येत्या काही दिवसांत टोल वसुलीसाठी दोन पर्याय देण्याचा सरकार विचार करत आहे. यामध्ये गाड्यांमध्ये जीपीएस यंत्रणा बसवणे हा पहिला पर्याय आहे. तर दुसरी पद्धत आधुनिक नंबर प्लेटशी संबंधित आहे. सध्या त्यासाठी नियोजन सुरू आहे.आतापर्यंत टोल न भरल्यास शिक्षेची तरतूद नाही, मात्र टोलबाबत विधेयक आणण्याची तयारी सुरू आहे. आता थेट तुमच्या बँक खात्यातून टोल टॅक्स कापला जाणार आहे.(Toll Tax Rules) त्यासाठी वेगळी कारवाई केली जाणार नाही. आता टोल टॅक्स भरावा लागणार नाही, थेट तुमच्या खात्यातून रक्कम कापली जाणार आहे. "आगामी काळात टोल टॅक्स वसूल करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही भर देण्यात येणार आहे. 2019 मध्ये आम्ही एक नियम केला होता की, कार कंपनीने फिट केलेल्या नंबर प्लेटसह येतील. त्यामुळेच गेल्या चार वर्षांत आलेल्या वाहनांवर वेगवेगळ्या नंबरप्लेट आहेत", असेही नितीन गडकरी यांनी सांगितले.

### प्रतिभावंतांचे दस्ताऐवजीकरण व्हावे...

नितीन गडकरी म्हणाले की तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे पूर्वी तंत्रज्ञान विकसित नव्हते. परंतु आता याच तंत्रज्ञानाचा वापर करून आपण अत्याधुनिक सोयी सुविधा यांचा लाभ घेऊ शकतो. त्यातून नव्या पिढीला ज्येष्ठ विचारवंत प्रतिभावंतांचे मार्गदर्शन मिळू शकते. त्याचे दस्ताऐवजी करण होऊ शकते असे गडकरी यांनी सांगितले. दिग्विजय सिंह म्हणाले की, प्रा. मोरे यांचे व्यक्तिमत्व प्रभावशाली होते. पिंपरी चिंचवड शहराच्या विकासामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे.

---

# 'डीएसके कुंजबन' सोसायटीत आषाढी वारी उत्साहात

## सोयायटीधाकरांनी दिला एकात्मतेचा संदेश : टाळ, पखवाज अन् अभंगाने भक्तीमय वातावरण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आधुनिक शिक्षण प्रणालीसह भारतीय संस्कृत आणि अध्यात्म याची ओळख नव्या पिढीमध्ये रुजावी. महाराष्ट्राला लाभलेली वैभवशाली संत परंपरा आणि संस्कारांचा वारसा पुढे चालावा, या संकल्पनेतून डीएसके कंजुबन हाऊसिंग सोसायटीच्या वतीने काढलेला 'आषाढी वारी' सोहळा उत्साहात पार पडला.**



सोसायटीच्या क्लब हाऊसमध्ये विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीची विधीवत पूजा करण्यात आली. त्यानंतर सोसायटीच्या आवारात वारीला सुरूवात झाली. भगवी पताका, टाळ, मृदंग, वीना आणि पखवाज वादनासह अभंगांच्या निनादात पादुका पालखी आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तींची वारी काढण्यात आली. सोसायटीतील रहिवशांनी पालखी सोहळ्यावर पुष्पवृष्टी केली. सर्व जाती-धर्माच्या आणि राज्य-परराज्यात सोसायटीत वास्तव्यास असलेल्या नागरिकांनी एकोप्याने हा उत्सव साजरा केला. सोसायटीचे सर्व सभासद आणि रहिवशांनी मनोभावे प्रसाद वाटप केले. रामायणाचार्य ह.भ.प. महावीर महाराज सूर्यवंशी यांनी कीर्तनातून रहिवाशांना आषाढी वारीचा इतिहास आणि महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. वारीतून मिळणारे ज्ञान आणि विज्ञान याचा ऊहापोह केला. पालखी सोहळ्याला ह. भ.प. मिरताई सूर्यवंशी, पखवाज वादक ह. भ. प. मल्हार महाराज गुळवे, वीणेकरी ह. भ. प. प्रधान महाराज काटे यांनी सेवा दिली.

### बाल वारकऱ्यांचे उपस्थितांकडून कौतूक...

आषाढी वारी पालखी सोहळ्यात सोसायटीतील बालचुमींनी उत्साहाने सहभाग घेतला. बाळगोपाळ, वारकरी आणि संतांची वेशभूषा केलेल्या लहानग्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. तसेच, गारगी पाटील, वेदिका सावळे, जुई जोगळेकर, आराध्या दिवे-पाटील, ऋणी वाळवेकर, स्वराली पाटील, सई म्हस्के, विहान सूर्यवंशी, गिरीजा गायकवाड यांच्यासह बाल वारकऱ्यांनी अभंग, गीत आणि गणेश वंदना सादर केली. उपस्थितांनी बालकांचे कौतूक केले. अबालवृद्धांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला आणि पालखी सोहळ्याची शोभा वाढवली.

सोसायटीचे चेअरमन योगेश सूर्यवंशी, सेक्रेटरी उत्तम नलावडे, खजिनदार युवराज पाटील आणि कमिटी सदस्य अभिजित वाळवेकर, संजय पाटील, अभिषेक पवार, संदीप पाटील, गौरव देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी सोहळ्याचे नियोजन करण्यात आले. सांस्कृतिक समितीच्या भाग्यश्री सूर्यवंशी, नेहा वाळवेकर, आकांक्षा देसाई, प्रियांका दिवे-पाटील, विद्या जोशी, दिप्ती पाटील, प्रज्ञा पाटील, प्रिया म्हस्के, कविता पाटील, कविता थोरात, सुप्रिया लाटकर, सोनाली पवार, सीमा जोगळेकर, कस्तुरी केदारी, आदिती कुलकर्णी, कीर्ती हरीमणी यांच्यासह महिलांनी संयोजनात पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अधिकराव दिवे-पाटील यांनी केले. आयोजनामध्ये व्यवस्थापक श्रीधर पन्हाळकर आणि सुरक्षा व स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.

# स्वत:ला जसे समजतो, तसेच घडत जात असतो !




**बालपणी मुले पटकन कुणाच्याही प्रभावात येतात. उपचाराच्या निमित्याने घरी येणारा डॉक्टर बघितल्यावर मुले त्याची नक्कल करायला लागतात. गळ्यात काहीतरी घालून त्याचा " स्टेथोस्कोप " सारखा उपयोग करीत आईच्या दंडावर इंजेक्शन देण्याचा मस्त अभिनय करतात. अशावेळी आजीचा चष्मा सुद्धा त्यांनी मागून घेतलेला असतो. हे सगळे दृश्य पालकांना मोठे रम्य आणि कौतुकास्पद वाटत असते.**

मुलांच्या नजरेला जे वारंवार पडेल त्याची नक्कल ते करीत असतात. त्यामुळे मुलांपुढे वाईट बाबी येऊ न देता प्रेरणादायी गोष्टी कश्या जातील याचा प्रयत्न अनेक पालक करीत असतात. अर्थात यापैकी डॉक्टरची नक्कल करणारे किरि मुले पुढे डॉक्टर होतात हा संशोधनाचा विषय आहे परंतु या प्रयत्नातून मुलांचा एखाद्या विषयाकडे ओढा निर्माण होऊ शकतो. अनेक मुलांमध्ये पालकांचा कला किंवा व्यावसायिक वारसा कसा उतरतो याचे हे उत्तम उदाहरण आहे.

आजच्या आधुनिक मानसशात्रात असे मानले जाते की आपण स्वतःला जसे समजतो पुढे तसेच घडत जातो. या संशोधनाची कल्पना नसताना सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना असाच एक प्रेरणादायी संदेश दिला होता. " जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की आपल्याला शासनकर्ती जमात बनायचे आहे " हा तो संदेश होता. ही प्रेरणा आणि आजचे प्रशासनातील बौद्ध अनुयायांचे प्रमाण बघितले तर बाबासाहेबांच्या या वाक्याचा अर्थ आणि ताकद लक्षात येते. सिग्मंड फ्राईड असे म्हणत होता की आपण एखादी प्रेरणा घेतो तेव्हा तिचा आणि परिणामांचा पूर्ण स्वीकार करतो आणि त्या दिशेने चालण्याचा





पूर्ण प्रयत्न करीत असतो. बालपणी घेतलेली एखादी प्रेरणा मुलांना कळत्या वयातही योग्य वाटली तर मुले त्या दिशेने जातात आणि एक दिवस त्या पदावर जाण्याचे स्वप्न सत्यात उतरून दाखवतात. अशी असंख्य स्वप्न सत्यात उतरली याचे दाखले सभोवताल दिसतात.

समाजात असंख्य प्रेरणादायी वक्ते आहेत ते सतत निराशेने ग्रासलेल्या लोकांना विविध क्षेत्रात सक्रिय होण्याच्या प्रेरणा देत असतात. बारावी नंतर काय ? असा प्रश्न ज्यांना भेडसावत असतो अश्या मुलांना अश्या वक्त्यांच्या भाषणातून अनेकदा " किक " बसू शकते.अमुक क्षेत्र माझे नाही किंवा तमुक गोष्ट मला जमणार नाही अशी निराशा ज्यांच्या डोक्यात घर करीत असते अश्या कोणत्याही वयाच्या लोकांसाठी " असे वक्ते प्रभावी ठरत असतात. तुम्ही आजच्या घडीला काय आहात यापेक्षा तुम्ही आतून स्वतःला काय समजता हे व्यक्तिमत्वाच्या दृष्टीने महत्वाचे मानले गेले आहे. आपण स्वतःला जसे समजतो तसेच घडत जात असतो हे वाक्य प्रभावी असले तरी प्रत्येकाच्या बाबतीत ते सत्यात उतरेलच असे खात्रीने सांगता येत नाही. बालपणी किंवा पालकांच्या हट्टापायी एखादी प्रतिमा मुलांवर लादली गेली असेल आणि प्रत्यक्षात तेवढी क्षमता मुलांमध्ये नसेल तर हे शक्य होत नाही.

शाळेत बा. शि. मर्ढेकर यांची एक गणपत वाणी नावाची कविता असायची , त्यातला गणपत वाणी हे मजेदार कॅरेक्टर होते. गणपत वाणी बिडी पिताना ,चावायचा नुसतीच काडी , म्हणायचा अन मनाशीच की ,या जागेवर बांधीन माडी , अनेकदा आपणही जिथे उभे असतो त्या जागेवर टपोरा बंगला बांधण्याचे स्वप्न बघत असतो किंवा ज्या दुकानावर नोकरी करीत असतो त्याच दुकानाचा एक दिवस मालक बनण्याचे मनाशी ठरवत असतो , हे अशक्य मुळीच नसते. आपण जे ध्येय ठरवतो त्या दिशेने कठोर परिश्रम आणि प्रभावी नियोजन करीत गेलो तर एक दिवस ते ध्येय साध्य केल्याचे लक्षात येते. आजच्या अनेक उद्योगपतींच्या जीवनकथा वाचल्या तर हे सहज लक्षात येईल की कधीकाळी आपल्याच पातळीवर असणारे हे लोक होते परंतु त्यांनी जिद्द,परिश्रम आणि नियोजन वापरून स्वतःचा कालबद्ध कार्यक्रम आखला आणि त्यादिशेने प्रवास सुरु केला.

नोकरी मागणारे नाही तर देणारे बना हे सुभाषित अनेकदा आपल्याला भुरळ पाडते आपण त्यादिशेने धावायला सुद्धा लागतो परंतु एका टप्प्यावर असे लक्षात येते की " ये अपने बस की बात नही " मग आपण निमूटपणे कुठेतरी नोकरी करीत त्यातच सुखाची स्वप्न बघायला लागतो. आपण स्वतःला जसे समजतो तसे घडत जातो हे जरी सत्य असले तरी त्याला आपल्यात असणाऱ्या क्षमतांचा निकष असतो हे ज्याला वेळेवर कळते तो योग्य निर्णय घेतो इतर चाचपडत बसतात. मोठी स्वप्न बघायला मात्र पैसा लागत नाही ,वैचारिक दारिद्र्य सोडून मोठी स्वप्न बघितली पाहिजेत तरच त्यातील एकाच्या मागे आपल्याला जाता येईल आणि शेवटी हे सूत्र कायम लक्षात ठेवले पाहिजे की एकाने गाठलेले शिखर दुसऱ्याला सुद्धा गाठता येते फक्त त्यामागे त्याने उपसलेले श्रम आपले हवेत. गॉडगिफ्ट कुणालाही नसते किंवा जन्मतः कुणीच महाज्ञानी नसतो ,प्रयत्नाने आजच्या काळात सगळे प्राप्त होऊ शकते हे कायम लक्षात ठेवा.

## संपादकीय »

### मुंबईचा संकटकाळ सुरु

***सगळ्या राज्याला जेव्हा पाऊस सुरू झाल्याचा आनंद होतो; तेव्हा महामुंबईकरांना या आनंदाबरोबरच आता पाणी कुठे साठणार, नाले कुठे तुंबणार, वाहतूक कुठे बंद पडणार आणि आपण खोळंबून कुठे पडणार.***

सगळ्या राज्याला जेव्हा पाऊस सुरू झाल्याचा आनंद होतो; तेव्हा महामुंबईकरांना या आनंदाबरोबरच आता पाणी कुठे साठणार, नाले कुठे तुंबणार, वाहतूक कुठे बंद पडणार आणि आपण खोळंबून कुठे पडणार, ही चिंता ग्रासते. मुंबईकर केवळ अडकूनच पडत नाहीत, तर काहीवेळा वाहूनही जातात. पावसाळ्यात एक-दोनदा तरी मैलोनमैल पायपीट करतात. लोकलसेवा किंवा बससेवा बंद पडल्याने हतबल होतात. ही सारी निसर्गाची अवकृपा नसते. तुंबणाऱ्या पाण्याचा निचरा न होणे आणि त्याहीपेक्षा मुंबईतील नालेसफाई शंभर टक्के आणि प्रामाणिकपणे न झाल्याचा हा परिणाम असतो. यंदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वत: रस्त्यांवर उतरून पाहणी करत आहेत. ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र, 'आधी पावसाचे स्वागत तर करा. बदनाम करायला अजून पुष्कळ वेळ आहे..'

**भारतात प्रत्येक नागरिकासाठी समान नागरी कायदा असावा, असे प्रतिपादन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताचे एक स्वप्नच अधोरेखित केले आहे.**

## समानतेच्या स्वप्नाकडे!



भारतात प्रत्येक नागरिकासाठी समान नागरी कायदा असावा, असे प्रतिपादन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताचे एक स्वप्नच अधोरेखित केले. घटना समितीच्या बैठकांमध्ये बाबासाहेबांनी समान नागरी कायद्याचा मुद्दा वारंवार मांडला. पंडित नेहरू हेही आरंभी समान नागरी कायद्याचे कट्टर समर्थक होते. मात्र, काँग्रेसमधील पुराणमतवादी गटापुढे त्यांना झुकावे लागले. पंडितजींच्या या कचखाऊ भूमिकेवरही डॉ. आंबेडकरांनी आसूड ओढले.

डॉ. आंबेडकरांनी पहिल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा देण्यामागे 'हिंदू कोड बिला'चे पडलेले चार तुकडे आणि समान नागरी कायद्याचे भंगलेले स्वप्न हे महत्त्वाचे कारण होते. तेव्हा स्वतंत्र नवभारत साकारत असताना समान नागरी कायदा केवळ राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये जाऊन बसला. या तत्त्वांना ना काळाचे बंधन होते; ना कायद्याचे. त्यामुळे, अजूनही समान नागरी कायदा तेथेच बसून आहे. पंतप्रधान मोदी भोपाळमध्ये म्हणाले त्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने हा प्रश्न वारंवार उपस्थित केला. सर्व केंद्र सरकारांकडे यासंबंधी विचारणा केली. जानेवारी, २०२२ मध्ये याचिकांची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सरकारला उद्देशून 'आम्ही तुम्हाला ही शेवटची संधी देत आहोत,' अशी कडक भाषा वापरली. सुप्रीम कोर्टाने छडीचा प्रसाद देऊनही हा कायदा का होत नाही, असा सवाल मोदींनी केला; त्याला हा संदर्भ होता. सर्वोच्च न्यायालयाने इशारा दिल्यानंतर सरकारने गेल्या वर्षी प्रतिज्ञापत्र सादर केले आणि सरकार समान नागरी कायदा करण्यास तयार आहे, असे त्यात नमूद केले. त्यानंतर, बाविसाव्या कायदा आयोगाने आपले काम सुरू केले. देशभरातील नागरिकांच्या सूचना आणि हरकती मागविणे, हा त्याच कामाचा एक भाग होता. मोदी यांच्या वक्तव्यामुळे समान नागरी कायद्याची लांबलेली प्रक्रिया एका तार्किक टप्प्यापर्यंत आली आहे. ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. या विषयाकडे जात, पात, धर्म, प्रांत, वंश, रुढी, चालीरीती किंवा कोणतीही अस्मिता यांच्या नजरेतून पाहणे म्हणजे भारताचा आधुनिक राष्ट्र बनण्याचा प्रवास अवरुद्ध करणे. हिंदू कोड बिलाला विरोध करणारे धर्ममार्तंड स्वातंत्र्यानंतर जी घोडचूक करीत होते; तीच घोडचूक आज 'मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड' आणि इतर धर्मांध मुस्लिम नेते करीत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदे-फडणवीसांमध्ये मतभेद?

## ‘त्या’ जाहिरात प्रकरणामुळे राज्याच्या राजकारणात मोठा गोंधळ

। मुंबई/ठाणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वर्तमान पत्रांच्या पहिल्या पानावर एक जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीत एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्रातील जनतेकडून मुख्यमंत्रीपदासाठी सर्वाधिक पसंती मिळाली असल्याचं एका सर्वेक्षणात दिसून आल्याचा दावा करण्यात आल होता. यात एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांपेक्षा अधिक**



**लोकप्रिय नेते असल्याचा दावा करण्यात आला होता.**

तसेच यापूर्वीच्या प्रत्येक जाहिरातीत एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे एकत्र फोटो असायचे, परंतु या जाहिरातीत केवळ एकनाथ शिंदे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोघांचेच फोटो होते. ही जाहिरात ‘राष्ट्रात नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्रात एकनाथ शिंदे’ अशा मथळ्याखाली प्रसिद्ध करण्यात आली होती. यापूर्वी भारतीय जनता पार्टी तसेच एनडीएतील पक्ष देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र अशी घोषणा द्यायचे.

### दोघेही महाराष्ट्राला न्याय देत आहेत

चंद्रशेखर बावनकुळे यांना प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला की, त्या जाहिरात प्रकरणामुळे देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात मतभेद निर्माण झाले आहेत का? यावर बावनकुळे म्हणाले, देवेंद्र फडणवीस हे मोठ्या मनाचे नेते आहेत. देवेंद्र फडणवीस किंवा एकनाथ शिंदे हे या अशा छोट्या मोठ्या जाहिरातींमुळे ज्यांचे संबंध खराब होतील असे नेते नाहीत. दोघेही विचारांनी खूप मोठे आणि प्रगल्भ आहेत. त्यामुळे त्या जाहिराती कोणी छापल्या? चुकीच्या छापल्या का? यावर त्या दोघांमध्ये काही किंतू, परंतु, जंतू नाहीत. त्यांच्या मनात काही येईल असंही होणार नाही. दोघेही महाराष्ट्राला न्याय देत आहेत. राज्यात उत्तम सरकार काम करत आहे.

परंतु एकनाथ शिंदे यांच्या जाहिरातीतल्या नव्या घोषणेने देवेंद्र फडणवीसांची घोषणा मागे राहिली. त्यामुळे राज्यात वेगवेगळ्या राजकीय चर्चांणा उधाण आलं आहे.

तसेच या जाहिरातीमुळे देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात मतभेद निर्माण झाले असल्याची चर्चा आहे.

यावर आता भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर दिलं आहे.

---

## सोलापुरात ईदगाहबाहेर पाकिस्तानी फुग्यांची विक्री; सूत्रधारांना अटक

।सोलापूर।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

आषाढी एकादशी,आणि बकरी ईद एकत्रपणे उत्साहाने आणि मंगलमय वातावरणात साजरी होत असतना सोलापुरात काही असामाजिक शक्ती सक्रिय होऊन शांतता व सुव्यवस्थेचा गालबोट लावण्याचा प्रयत्न करीत असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. बकरी ईदनिमित्त ईदगाह मैदानावर समूहिक नमाज अदा झाल्यानंतर ईदगाहाबाहेर बालबच्च्यांसाठी खरेदी केले जाणारे फुगे चक्क पाकिस्तानी असल्याचे आढळून आले. ‘ लव्ह पाकिस्तान ‘ या मजकुरासह पाकिस्तानी ध्वज छापलेले फुग्यांची विक्री होताना मुस्लीम बांधवांनी वेळीच जागरूकता दाखविली.,फुगे विकणा-या संबंधित दोन व्यक्तींना ताब्यात पोलिसांच्या हवाली केले.

अजय अमन पवार व शिवाजी लक्ष्मण पवार (रा. पारधी वस्ती, विजापूर रोड, सोलापूर) अशी फुगे विकणा-यांची नावे आहेत. या दोघांनी ज्या विक्रेत्याकडून हे पाकिस्तानी फुगे खरेदी केले, त्या व्यापा-याचाही शोध घेण्यात आला असून त्याचे नाव तन्वीर बागवान असे आहे.एरव्ही, अडाणी, अशिक्षित असलेले हे अजय आणि शिवाजी हे पारधी समाजाचे फुगेवाले मधला



मारूती परिसरात फुगे विकतात, अशी माहिती समोर आली आहे. त्यांना ताब्यात घेऊन पोलीस कसून चौकशी केली असता त्यांनी दिलेल्या माहितीनुसार फुगे विक्री करणारा व्यापारी तन्वीर बागवान याच्यापर्यंत पोलीस पोहोचले. या तिघांविरूध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हिंदू-मुस्लीम धर्मियांमध्ये तेढ निर्माण करण्याच्या आणि हिंदू-मुस्लीम एकोपा नष्ट करण्याच्या उद्देशाने भारतीय नागरिकांच्या सार्वभौमत्वाचा अवमान केल्याचा आरोप या तिघा आरोपींवर ठेवण्यात आला आहे. तन्वीर बागवान याचे मधला मारूती परिसरात न्यू रोशन खिलौना हाऊस नावाचे दुकान आहे. या दुकानात पाकिस्तानी फुग्यांचा साठा करून विक्री केली जात होती. सकाळी होटगी रस्त्यावर नवीन आलमगीर ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण करण्यासाठी परंपरेनुसार हजारो मुस्लीम बांधव बालबच्च्यांसाठी आले होते. नमाज अदा झाल्यानंतर एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत, गळाभेट घेऊन मुस्लीम बांधव ईदगाहबाहेर आले.

---

## मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार?

### मुनगंटीवार म्हणाले, “मंत्र्यांची नावं आणि खाती निश्चित

। शिराळा ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्रात शिवसेनेचा शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टीचं सरकार येऊन आता उद्या (३० जून) एक वर्ष पूर्ण होईल. तरी अद्याप या सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार झालेला नाही. परंतु लवकरच शिंदे-फडणवीस सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार होईल अशी चर्चा आहे. जून महिन्याच्या पहिला आठवड्यात मंत्रिमंडळाचा विस्तार होईल अशी चर्चा होती, परंतु तसं काही झालं नाही. त्यानंतर नव्या सरकारला एक वर्ष पूर्ण होण्याच्या मुहुर्तावर मंत्रिमंडळाचा विस्तार होईल अशी चर्चा रंगू लागली. परंतु त्या चर्चादेखील फोल ठरल्या आहेत.**

शिंदे सरकारच्या मंत्रिमंडळाच्या विस्ताराची जनतेसह भाजपा आणि शिवसेना (शिंदे गट) या दोन्ही पक्षातील अनेक इच्छूक आमदारांना प्रतीक्षा आहे. परंतु त्या दृष्टीने पावलं उचलेली दिसत नाहीत.

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होईल असं बोललं जात आहे. याबाबत प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी सांस्कृतिक मंत्री आणि महाराष्ट्र भाजपाचे वरिष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांना प्रश्न विचारला. त्यावर मुनगंटीवार यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली. मुनगंटीवार म्हणाले, साधारणतः मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यासंदर्भात निर्णय झाल्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री आपल्याला निश्चितपणे माहिती देतील.

यासंदर्भात मी भाष्य करणं योग्य ठरणार नाही आणि तो माझा अधिकरही नाही. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा करून निर्णय घेतील. मंत्रिमंडळाचं आकारमान, मंत्र्यांची नाव आणि खाती निश्चित करतील.

नागरिक म्हणून विचार केला तर मला व्यक्तिगत असं वाटतं



### मंत्रिमंडळ विस्ताराबात देवेंद्र फडणवीस काय

**मंत्रिमंडळ विस्ताराबाबत अलिकडेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांच्याशी चर्चा केल्याचं सांगितलं जात होतं. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना औरंगाबादेत प्रसारमाध्यमांशी बोलत असताना माध्यमांच्या प्रतिनिधींनी मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत प्रश्न विचारला होता, तसेच याबाबत अमित शाह यांच्याशी काय चर्चा झाली असाही प्रश्न विचारला. यावर फडणवीस म्हणाले होते की, “मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा अमित शाहांबरोबर झालेली नाही. मात्र आम्हाला मंत्रिमंडळ विस्तार करायचा आहे आणि योग्यवेळी आम्ही तो करू.”**

की विधानसभेच्या अधिवेशनाच्या अगोदर हा विस्तार होऊ शकतो. मी निश्चितपणे सांगू शकत नाही, मी केवळ शक्यता सांगतोय.

# नम्रता संभेरावने शेअर केला समीर चौघुलेंचा 10 वर्षांपूर्वीचा फोटो



नम्रता संभेराव समीर चौघुले महाराष्ट्राची हास्यजत्रा' शोमधून घराघरात पोहोचलेले प्रसिद्ध अभिनेते म्हणजे समीर चौघुले. अभिनय कौशल्याच्या जोरावर त्यांनी मराठी कलाविश्वात स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं. आज समीर चौघुले त्यांचा ५० वा वाढदिवस साजरा करत आहे. त्यानिमित्ताने अभिनेत्री नम्रता संभेरावने एक खास पोस्ट शेअर केली आहे. नम्रता संभेराव ही सोशल मीडियावर सक्रीय असते. नुकतंच नम्रता संभेरावने समीर चौघुलेंबरोबरचा एक फोटो पोस्ट केला आहे. या फोटोबरोबर तिने कॅप्शन देत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

आणखी वाचा : “माझा आता कोणताही संबंध नाही…” ‘आई कुठे काय करते’ फेम मधुराणी प्रभुलकरने दिला राजीनामा

बालकलाकार साईशा भोईरच्या आईच्या पोलीस कोठडीत वाढ; आणखी तक्रारी आल्याची पोलिसांची माहिती, नेमकं प्रकरण काय?

HAPPY BIRTHDAY समीर चौघुले दाद्या, आमचं तुझ्यावर खूप खूप प्रेम आहे. हा खूप जुना १० वर्षांपूर्वीचा फोटो सापडला मला तुझ्या तरुणपणीचा, अजूनही तेवढाच तरुण आहेस, तुझं तारुण्य असंच बहरू दे, काम करण्याची तुझी ENERGY तुझं PASSION एखाद्या तरुणाला लाजवेल एवढी जबरदस्त आहे, ह्या जन्मात तुला काम करताना अनुभवणं हि माझ्यासाठी पर्वणी आहे. एवढंच सांगेन असाच रहा, RELAX रहा, तरुण रहा, कायम आणि आम्हाला हसवत रहा, असे नम्रता संभेरावने म्हटले आहे.

# अलका याज्ञिक यांचा 'यूट्यूब'वरही डंका!

बॉलिवूडमधील पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांच्या सुरेल आवाजाने तर सर्वांनाच वेड लावलं आहे. मग तो काळ ९० चे दशक असो किंवा आजचा काळ असो त्यांची क्रेझ अजुनही कायम आहे. त्याच्या गाण्यांचे अनेक चाहते आहेत. आवाजाच्या जोरावर अलका याज्ञिकने चाहत्यांच्या मनावर राज्य केले आहे. आज त्यांनी यूट्यूबवरही राज्य केले आहे.अलका याज्ञिक या 14.8 बिलियन स्ट्रीम्ससह यूट्यूबवर सर्वाधिक ऐकलेली गेलेली गायिका बनल्या आहे.

होय, गेल्या 12 महिन्यांत अलका याज्ञिक यांची गाणी सर्वाधिक वेळा ऐकण्यात आली आहे, ज्यामुळे त्या 2022 मध्ये जगातील सर्वाधिक ऐकल्या जाणाऱ्या गायिका बनल्या आहेत.लिबर्टी गेम्सने जारी केलेल्या आकडेवारीत अलका याज्ञिकबाबत हा खुलासा करण्यात आला आहे. लिबर्टी गेम्सने प्रत्येक देशातील शीर्ष संगीत कलाकार शोधण्यासाठी यूट्यूबवरच्या संगीत व्हिडिओ चार्टवरील प्ले करण्यात आलेल्या गाण्याच्या संख्येंचे विश्लेषण केले आणि परिणाम आश्चर्यकारक होते.लिबर्टी गेम्सने जगभरातील चार्टवर अलका याज्ञिकचे नाव पहिले होते.गेल्या 12 महिन्यात अलका याज्ञिक यांना सर्वाधिक वेळा ऐकण्यात आले आहे, ज्यामुळे त्या 2022 मध्ये जगातील सर्वाधिक ऐकल्या गेलेल्या कलाकार बनल्या आहे.

या यादीत अलका याज्ञिक यांच्या व्यतिरिक्त इतर भारतीय गायकांनी आपले स्थान निर्माण केले आहे. अरिजित सिंग, कुमार सानू आणि उदित नारायण या गायकांनीही जगातील टॉप 10 सर्वाधिक ऐकलेल्या कलाकारांच्या यादीत आपले स्थान निर्माण केले आहे.

अलका याज्ञिकच्या टॉप गाण्यांबद्दल बोलायचे तर, उदित नारायण आणि कुमार सानू सारख्या प्रसिद्ध गायकांनी गायलेल्या त्याच्या सदाबहार गाण्यांचा समावेश आहे. तिच्या हिट लिस्टमध्ये 'मेरा दिल भी कितना पागल है', 'टिप टिप बरसा पानी', 'ए मेरे हमसफर', 'कुछ कुछ होता है' यासारख्या काही ब्लॉकबस्टर गाण्यांचा समावेश आहे.



# हीच खरी अप्सरा... सोनालीचा नवा लूक पाहून चाहत्यांनी केलं कौतुक



अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने तिच्या अभिनयाने आणि नृत्याने सर्वांच्याच मनात स्वतःचं हक्काचं स्थान मिळवलं आहे. सोनाली कुलकर्णी सोशल मीडियावर सुद्धा खूप सक्रिय असते. ती अनेक व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर शेअर करत नेहमीच चाहत्यांचं लक्ष वेधून घेते. सोनाली वारंवार आपल्या वेगवेगळ्या लूकमधील फोटो तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत असते.अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने तिच्या अभिनयाने आणि नृत्याने सर्वांच्याच मनात स्वतःचं हक्काचं स्थान मिळवलं आहे.सोनाली कुलकर्णी सोशल मीडियावर सुद्धा खूप सक्रिय असते.सोनाली अनेक व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर शेअर करत नेहमीच चाहत्यांचं लक्ष वेधून घेते.सोनाली वारंवार आपल्या वेगवेगळ्या लूकमधील फोटो तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत असते.सोनालीचा ब्यूटीफुल लूक पाहून चाहते लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. सोनालीचे सोशल मीडियावर लाखो चाहते आहेत.

# कार्तिक-कियाराच्या 'सत्यप्रेम की कथा' चित्रपटाने पहिल्या दिवशी किती कमाई केली?



कार्तिक आर्यन व कियारा अडवाणी यांचा 'सत्यप्रेम की कथा' हा चित्रपट गुरुवारी (२९ जून रोजी) सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून सकारात्मक प्रतिक्रिया मिळाल्या होत्या. तर, समीक्षकानींही चित्रपट एंटरटेनिंग असल्याचं म्हटलं होतं. अशातच या चित्रपटाच्या पहिल्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहेत.

कियारा अडवाणी आणि कार्तिक आर्यनची जोडी 'भूल भुलैया २'मध्ये दिसली होती. यामध्ये त्यांच्या जोडी प्रेक्षकांना फार आवडली होती. चित्रपटानेही खूप चांगली कामगिरी केली होती. त्यानंतर आता 'सत्यप्रेम की कथा'मधून ही जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर परतली आहे. पण या चित्रपटाला 'भूल भुलैया २' सारखा प्रतिसाद मिळाला नाहीये. तसेच चित्रपटाची पहिल्या दिवसाची कमाईही त्या तुलनेत कमी आहे.

'सॅकनिल्क'च्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, 'सत्यप्रेम की कथा' ने रिलीजच्या पहिल्या दिवशी अंदाजे ९ कोटी रुपयांची कमाई केली आहे. 'सत्यप्रेम की कथा' हा चित्रपट बकरी ईदच्या सुट्टीच्या दिवशी निर्मात्यांनी प्रदर्शित केला.

# भारतीय संघाला मिळणार नवे प्रशिक्षक!

## डिसेंबरपासून प्रशिक्षक पदाची जागा रिक्त; मराठमोळ्या माजी क्रिकेटपटूंची नावे चर्चेत

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय क्रिकेट संघाला लवकरच नवीन प्रशिक्षक मिळणार आहे. या पदासाठी तीन जणांची नावे पुढे आली आहेत. अमोल मजुमदार आणि तुषार आरोठे या माजी क्रिकेटपटूंनी या पदासाठी अर्ज केले आहेत. त्याचबरोबर इंग्लंडच्या जॉन लुईसचे नावही समोर येत आहे..**



टीम इंडियाला आता नवे प्रशिक्षक मिळणार आहेत. भारतीय महिला संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी निवडलेल्या उमेदवारांमध्ये अमोल मजुमदार आणि तुषार आरोठे यांचा समावेश आहे, त्यांची मुलाखत ३० जून रोजी होणार आहे. आरोठे यांनी यापूर्वी भारतीय संघाचे प्रशिक्षकपद भूषवले आहे, तर इंडियन प्रीमियर लीग फ्रँचायझी राजस्थान रॉयल्स आणि दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षक असलेले मजुमदार बडोद्याचे प्रशिक्षक बनण्यासाठी चर्चा सुरू आहे.

इंग्लंडचे डरहॅमचे माजी प्रशिक्षक जॉन लुईस यांनीही या पदासाठी अर्ज केल्याचे कळते. अशोक मल्होत्रा, जतीन परांजपे आणि सुलक्षणा नायक यांचा समावेश असलेली क्रिकेट सल्लागार समिती (CAC) मुंबईत मुलाखत घेणार आहे. बीसीसीआय (भारतीय क्रिकेट बोर्ड) अधिकाऱ्याने सांगितले की, "शुक्रवारी मुलाखती होणार आहेत."

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ डिसेंबरपासून रमेश पोवार यांना पदावरून हटवल्यापासून मुख्य प्रशिक्षकाशिवाय आहे. या वर्षाच्या सुरुवातीला टी-२० विश्वचषकादरम्यान फलंदाजी प्रशिक्षक हृषिकेश कानिटकर यांनी संघाची जबाबदारी घेतली होती. एका माजी भारतीय खेळाडूने सांगितले की, 'तुषारला परत आणणे हा चांगला पर्याय असेल असे मला वाटत नाही. संघाला नवीन कल्पना असलेल्या प्रशिक्षकाची गरज आहे.

### जस्ट स्टॉप ऑइल ग्रुप नेमकं आहे तरी काय?

अमोलसारख्या प्रशिक्षकाने संघाला पुढे नेणे योग्य ठरेल.' मुख्य प्रशिक्षक निवडल्यानंतर, CAC भारतीय पुरुष संघासाठी मुख्य निवडकर्ता नियुक्त करण्याची शक्यता आहे कारण चेतन शर्मांच्या हकालपट्टीनंतर हे पद फेब्रुवारीपासून रिक्त आहे. यासाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३० जून असून मुलाखत १ जुलै रोजी होण्याची शक्यता आहे. मुख्य निवडकर्ता पदाच्या शर्यतीत अजित आगरकर आघाडीवर आहेत.

# महाविक्रम! स्टीव्ह स्मिथने कसोटीत राहुल द्रविड यांचा मोठा रेकॉर्ड मोडला

।लंडन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

स्टीव्ह स्मिथ हा एक उत्कृष्ट कसोटी फलंदाज आहे. सध्या ऑस्ट्रेलिया संघ इंग्लंडविरुद्ध अॅशेस मालिका खेळत आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात स्टीव्ह स्मिथने खुद्द राहुल द्रविड यांचा मोठा विक्रम मोडीत काढला आहे. स्टीव्ह स्मिथने लंडनमधील लॉर्ड्स स्टेडियमवर अॅशेस मालिकेतील दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी नाबाद ८५ धावा करताना ९,००० कसोटी धावा पूर्ण केल्या. इथपर्यंत पोहोचणारा तो दुसरा वेगवान खेळाडू ठरला. स्टीव्ह स्मिथने इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या अॅशेस कसोटीत १७४ डावांत ही कामगिरी केली. पहिल्या क्रमांकावर श्रीलंकेचा महान फलंदाज कुमार संगकारा आहे, ज्याने १७२ डावांमध्ये ही कामगिरी केली होती. मात्र, ही कामगिरी करण्यासाठी सामन्यांच्या बाबतीत स्मिथने सर्वात वेगवान ही कामगिरी आपल्या नावे केली आहे. तो फक्त ९९ सामने खेळला आहे. स्मिथने ५६.६१ च्या सरासरीने ३७ अर्धशतके आणि ३१ शतके झळकावली आहेत. पहिल्या दिवसअखेर ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजाने अर्धशतक झळकावत १५० चेंडूत ८५ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या दिवशी ५ गड्यांच्या मोबदल्यात ३३९ धावा केल्या आहेत. सलग १०० कसोटी सामने खेळणारा ऑस्ट्रेलियाचा ऑफस्पिनर नॅथन लायन हा पहिला स्पेशलिस्ट गोलंदाज ठरला आहे. जुलै २०११ मध्ये कसोटीत पदार्पण करणारा लायन सलग १०० कसोटी खेळणारा क्रिकेटच्या इतिहासातील सहावा खेळाडू ठरला आहे. या यादीत अॅलिस्टर कूक (१५९), अॅलन बॉर्डर (१५३), मार्क वॉ (१०७), सुनील गावस्कर (१०६) आणि ब्रेंडन मॅक्युलम (१०१) यांचा समावेश आहे. योगायोगाने लॉर्ड्सवर लियॉनने ही दुर्मिळ कामगिरी केली आहे. येथेच त्याला अखेरच्या कसोटी इलेव्हनमधून वगळण्यात आले. २०१३ च्या अॅशेस मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाच्या इंग्लंड दौऱ्यादरम्यान जवळपास एक दशकापूर्वीची ही गोष्ट आहे. १२२वी कसोटी खेळताना लियॉन म्हणाला, "ही एक अशी गोष्ट आहे ज्याचा मला खरंच खूप अभिमान वाटतो."



### राहुल द्रविडचा यांचा विक्रम मोडला

कसोटी क्रिकेटमध्ये ९००० धावांचा पल्ला गाठण्यासाठी द्रविडने १७६ डाव खेळले होते, तर स्मिथने त्यांच्यापेक्षा २ डाव कमी खेळले आहेत. या यादीत भारताचा महान द्रविडच नाही तर ब्रायन लारा, सचिन तेंडुलकर यांसारखे फलंदाजही खूप मागे आहेत. लारा आणि रिकी पाँटिंगच्या नावावर प्रत्येकी १७७ डाव आहेत, तर सचिन तेंडुलकरच्या नावावर १७९ डावात ९००० धावा करण्याचा विक्रम आहे.

# भारताला मिळाला अजून एक दमदार फलंदाज, दुलीप ट्रॉफीमध्ये शतकी खेळी; सावरला संघाचा डाव


। बेंगळुरू ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**एकीकडे सर्फराज खानसारखा खेळाडू निवडला न गेल्याने नाराजी व्यक्त होत आहे, तर दुसरीकडे आणखी एका फलंदाजाने शतक झळकावून टीम इंडियासाठी आपली दावेदारी घोषित केली आहे.**

भारतामध्ये एकापेक्षा उत्कृष्ट क्रिकेटपटू आहेत हे आपल्याला विविध टुर्नामेंट मधून पाहायला मिळते. रणजी क्रिकेट असो दुलीप ट्रॉफी असो व आयपीएल असो अनेक नवनवीन कौशल्य असलेले हे क्रिकेटपटू आपल्याला त्यांच्या अद्वितीय कौशल्याने सर्वांना प्रभावित करतात. असाच एक खेळाडू दुलीप ट्रॉफीमध्ये आपल्या खेळीने सर्वांना प्रभावित करताना दिसला. तो म्हणजे ध्रुव शौरी. ध्रुवने या सामन्यात झंझावाती शतकी कामगिरी केली आहे.

ध्रुव शौरीने केलेल्या शतकी खेळीमुळे एम चिन्नास्वामी स्टेडियमवर ईशान्य विभागाविरुद्ध चार दिवसीय दुलीप करंडक उपांत्यपूर्व फेरीच्या पहिल्या दिवशी उत्तर विभागाने ८७ षटकांत ६ बाद ३०६ धावा केल्या. निशांत सिंधूनेही ७६ धावांचे नाबाद अर्धशतक झळकावत डाव मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. दिल्लीचा खेळाडू शोरी या सामन्यापूर्वी उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता आणि त्याने तीच लय कायम ठेवली.

३१ वर्षीय गेल्या रणजी ट्रॉफी हंगामात चौथ्या क्रमांकावर सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला आणि त्याचा अनुभव दिवसभरातील त्याच्या खेळीतून दिसून आला. त्याने २०२२-२३ रणजी हंगामातील सात सामन्यांमध्ये ९५.४४ च्या उत्कृष्ट सरासरीने ८५९ धावा केल्या, ज्यात तीन शतकांचा समावेश आहे. नॉर्थ ईस्टने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शोरीने मात्र जोतीन सिंग, पालजोर तमांग आणि डिप्पू संगमा या वेगवान गोलंदाजांविरुद्ध सामना करण्यास वेळ दिला.



### शानदार भागीदारी

शौरी आणि निशांत यांनी सुमारे २२ षटकात पाचव्या विकेटसाठी ८० धावांची भागीदारी केली, ज्यामुळे उत्तर विभागीय संघाचा दबाव थोडा कमी झाला. डावखुरा फिरकीपटू किशन सिंघाने दोन चेंडूंत दोन विकेट्स घेत शौरी आणि कर्णधार जयंत यादव यांच्या विकेट्ससह धावसंख्या सहा बाद २४२ पर्यंत नेली. सुमारे ३० षटके बाकी असताना, निशांत आणि पुलकित नांगर यांनी सातव्या विकेटसाठी ६४ धावांची भागीदारी करून संघाला सावरण्यास मदत केली आणि खराब प्रकाशामुळे खेळ रद्द होईपर्यंत उत्तर विभाग चांगल्या स्थितीत होता.